# गावठी पिस्टल, ११ जिवंत काडतुसांसह दोन आरोपीतांना घेतले ताब्यात

## नांदेड ग्रामीण पोलिसांची कामगिरी

**नवीन नांदेड** – नांदेड ग्रामीण पोलिसांनी दि. १३ मार्च रोजी मिळालेल्या माहितीवरून दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून एक गावठी पिस्टल व सात काडतुसे जप्त केली आहेत. तसेच त्यांच्याकडून ३५ हजार ५०० रूपये जप्त केले. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दित अवैध गावठी पिस्टल बाळगणाऱ्यांचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी, सुशीलकुमार नायक यांनी नांदेड ग्रामीण पोलिसांना दिले होते. त्यानुसार नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक एन. एस.आयलाने, स.पो. नि. सचिन गढवे, पोउपनि महेश कोरे, प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, विक्रम वाकोडे, मारोती जळबा माने, शेख सत्तार मगदुम, मारोती पचलिंग, माधव माने, चंद्रकांत स्वामी, शिवानंद पंडीतराव तेजबंद, शंकर रेवन माळगे, मंगेश दिगांबर पालेपवाड, विठ्ठल माधव भिसे यांनी १३ मार्च २४ रोजी ईदगाह मैदानच्या कोपऱ्यात पाकीजानगर येथे धाड टाकली. या धाडीत शेख इलियास शेख इरफान (वय २३, व्यवसाय मजुरी रा. पाकीजानगर), शेख शहबाज शेख शकील (वय २४, व्यवसाय मजुरी रा. दुधडेरी रहिमपुर) यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे शेख इलियास शेख इरफान याच्याकडे गावठी पिस्टल, चार



पितळी जिवंत काडतुस मिळून आले. तसेच शेख शहबाज शेख शकील याच्याकडून सात जिवंत काडतुस आढळून आले. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल ताब्यात घेतला असून या दोन्ही आरोपी विरोधात गुन्हा दाखल आहे. सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे हे करीत आहेत.

या कामगिरीबद्दल पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी, सुशीलकुमार नायक यांनी नांदेड ग्रामीण पोलिसांचे अभिनंदन केले आहे.

दै. पुण्यनगरी

# पिस्टलसह ११ जिवंत काडतूस बाळगणारे आरोपी जेरबंद

**नवीन नांदेड** : नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणावर गावठी पिस्टल सापडत आहेत. पंधरा दिवसांपूर्वीच एका आरोपीकडून गावठी पिस्टल व खंजर जप्त करण्यात आली होती. गुरुवारी नांदेड ग्रामीण पोलिसांनी आणखी दोघांना ताब्यात घेतले असून त्याच्याकडून गावठी पिस्टल, काडतुसे जप्त केली आहेत.

पोलिस अधीक्षक,अपर पोलिस अधीक्षक,उपविभागीय पोलिस अधिकारी इतवारा यांनी दिलेल्या निर्देशानुसार, नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याचे प्रभारी एन.एस.आयलाने, स.पो.नि. सचिन गढवे, पोउपनिरीक्षक महेश कोरे, प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, विक्रम वाकोडे, मारोती जळबा माने, शेख सत्तार मगदुम,मारोती पचलिंग, माधव माने, चंद्रकांत स्वामी, शिवानंद पंडीतराव तेजबंद, शंकर रेवन माळगे, मंगेश दिगांबर पालेपवाड, विठ्ठल माधव भिसे यांच्या पथकाला दोघा आरोपींविषयी माहिती मिळाली. त्यानंतर या पथकाने बुधवारी (दि.१३) ईदगाह मैदानच्या कोपऱ्यात पाकिजानगर नांदेड येथे छापा मारला असता तेथे शेख इलियास शेख इरफान २३ रा. पाकीजानगर नांदेड, शेख शहबाज शेख शकील २४ रा. दुध डेअरी रहिमपुर, नांदेड यांना ताब्यात घेतले.शेख इलियासकडून गावठी पिस्टल, किंमत ३० हजार रुपये, ४ जिवंत काडतुसे किंमत २ हजार रुपये तर शेख शहबाज शेख शकीलकडून ७ जिवंत काडतुसे किंमत ३५ हजार ५०० रुपये असा मुद्देमाल आढळून आला. नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याचे सपोनि सचिन गढवे पुढील तपास करीत आहेत.

## नांदेड शहरात १५ दिवसांतील दुसरी घटना, पिस्टल येतात तरी कोठून? नागरिकांचा सवाल

